रजेशिवाय असलेल्या अनुपस्थितीच्या कालावधी-
भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परिवर्तन
करण्यासंबंधातील अधिकार.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक अरजा-२४९३/प्र.क्र.८०/९१/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दिनांक १२ ऑगस्ट १९९४.

शासन निर्णय,

महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ नुसार शासनाने अधिकार प्रत्यायोजित केलेले अधिकारी म.ना.से.[रजा] नियम १९८१ च्या परिशिष्ट एक मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. या परिशिष्टातील अ.क्र.१० मध्ये नियुक्ती करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यास म.ना.से.[रजा] नियम १९८१ च्या नियम ६३ [६] च्या तरतुदीनुसार अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नव्वद दिवसांपर्यंत आणि स्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एक वर्षापर्यंत रजेशिवाय असलेल्या अनुपस्थितीच्या कालावधीचे भूतलक्षी प्रभावाने असाधारणरजेत परिवर्तन करण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. या अधिकाऱ्यांच्या निश्चित मर्यादेबाबत शंका निर्माण झालेली होती.

२. शासन आता असा आदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ च्या परिशिष्ट एक मधील अ.क्र.१० समोरील सध्याच्या तरतुदी खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

| अ. क्र. [१] | नियम क्रमांक [२] | अधिकाराचे स्वरूप [३] | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी [४] | व्याप्ती [५] | शेरा [६] |
|---|---|---|---|---|---|
| १० | ६३[६] | रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याचा काला-वधी भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परिवर्तीत करण्याचा अधिकार. | नियुक्त्या करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी. | अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नव्वद दिवसांपर्यंत आणि स्थायी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एक वर्षापर्यंत मात्र वरील मर्यादेच्या पलिकडील रजा मंजूर करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील. | |

३. महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदी-मध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरती सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात यावे.

....२/-

उपरोक्त नियमांत यथावकाश रीतसर सुधारणा करण्यात येईल.

४. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. म. बसनाक,
शासनाचे अवर सचिव.

———x———

क्रमांक आस्थापना/३/रजा/कावि/७३५/
९
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी, दि. २९-१०-१९९४.

प्रत :- १] तहसीलदार [सर्व]
२] उपविभागीय अधिकारी [सर्व]
३] विशेष भू संपादन अधिकारी [सर्व]
४] शाखा प्रमुख.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी करिता.

बि/२९१०९४...